# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३**

## ग्रामविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ६७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- ८३,७२,६७,१२,०००/-**<br>**श्री. कैलास गोरंट्याल** |
| (१) | ५२१४ | १० | तांबळडेग, ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग उत्तरवाडा सागरी मार्ग मुख्य रस्ता आशा आडकर यांचे घर ते शंकर भाबल यांच्या घरापर्यंतचा रस्ता हा पर्यटनदृष्ट्या तसेच समुद्राकडे जाणारा रस्ता असणे, या रस्त्यावरुन पर्यटक तसेच ग्रामस्थांचा दिवस-रात्र वावर असणे, त्याठिकाणी स्ट्रीट लाईन नसल्याने पर्यटकांचे तसेच ग्रामस्थांचे हाल होत असणे, रस्त्यावर लाईट नसल्याने चोऱ्या-माऱ्या होण्याची शक्यता असल्याने याठिकाणी तातडीने स्ट्रीट लाईट बसविण्याकरिता शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- ५०,४६,०१,०००/-**<br>**श्री. दिलीप वळसे-पाटील** |
| (२) | ५२९४ | १० | "पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव पुणे जिल्हा परिषदेने जून, 2022 मध्ये शासनाकडे सादर करुनही अद्याप विस्तारीत इमारतीच्या बांधकामास मंजूरी व निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे पंचायत समितीमध्ये येणा-या सर्व सामान्य नागरीकांची होणारी गैरसोय, यामुळे तालुक्यातील जनतेमध्ये पसरलेला असंतोष, याबबत शासनाने तातडीने करावाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३) | ५३०५ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली येथे शासनाकडून ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे परिवर्तीत नवीन ५० खांटाच्या उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय करून प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, या दोन्ही उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी तसेच वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी टाईप १ व २ प्रस्ताव टाईप ३ व ४ अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी रितसर प्रस्ताव तयार करून जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा सामान्य रूग्णालय चंद्रपूर यांच्यामार्फतीने ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीकरिता प्रस्ताव पाठविण्यात येणे, सिंदेवाही व सावली येथील उपलब्ध |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जागेच्या अनुशंगाने ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकाम करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणे, तसेच ब्रम्हपूरी येथील १०० खांटाचे उपजिल्हा ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थनाचे बांधकाम करण्यासाठी टाईप १ व २, टाईप ३ व ४ चे अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी रितसर प्रस्ताव तयार करून जिल्हा शल्यचिकिस्तक सामान्य रूग्णालय चंद्रपूर यांच्यामार्फतीने ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीकरिता प्रस्ताव पाठविण्यात येणे, परंतू हे सर्व प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडे अंतिम मंजूरी विना प्रलंबित असल्याने नागरिकांना आरोग्याच्या सोईसुविधा पासून वंचित राहावे लागत असल्याने नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामुळे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे इमारत बांधकाम तसेच अधिकारी/कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम आणि ब्रम्हपूरी येथील वैघकीयअधिकारी/कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम करणेबाबतच्या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.<br>**मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४१५, कृषि विषयक संशोधन व शिक्षण**<br>**रूपये:- ११,३४,१४,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (४) | ५१५८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रात ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही या तालुक्याचा समावेश असून या प्रत्येक तालुक्यात किमान १०० ते १२० गावाचा समावेश असणे, या गावाच्या व मुलभुत सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी अनेक ठिकाणी ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक व ग्रामविस्तार अधिकारी कार्यरत असणे, या ग्रामसेवकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व ईतर कामाचे प्रशिक्षण घेण्यासाठी ईतरत्र जावे लागत असल्याने या तिनही तालुक्याच्या ठिकाणी ग्रामसेवक प्रशिक्षण केंद निर्माण करणे अत्यंत आवश्यक असणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील बम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथे ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र स्थापन करणेबाबत व त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.<br>**मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५०१, ग्रामविकासासाठी विशेष कार्यक्रम**<br>**रूपये:- १२,०७,१९,६३,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (५) | ५२४१ | १० | अमरावती जिल्हयातील मेळघाटच्या सर्वागिंण विकासासाठी शासनाने नवसंजीवनी योजना लागू केली होती व त्या अंतर्गत महत्वाचे पाच विभाग जोडले होते हे सर्व मुख्य विभाग एकत्र करुन काम करील अशी योजना होती या योजनेला निधी प्राप्त झाला नसल्याने तसेच या विभागांचा अंतर्गत समन्वय नसल्यामुळे मेळघाटचा विकास खुंटला आहे , करीता मेळघाटच्या विकासाबाबत निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | ५२५१ | १० | अमरावती जिल्हा परिषद व पंचायत समितीवर सध्या प्रशासक असल्यामुळे 15 व्या वित्त आयोगातील सन 2022-23 या आर्थिक वर्षाचा दोन्ही मिळून सुमारे 24 कोटींचा निधी अजूनही प्राप्त झाला नाही, सदरील निधी अभावी अमरावती जिल्हयातील ग्रामीण भागातील विकास कामे रखडलेली आहे, निधीची तरतूद करुन जिल्हा परिषद व पंचायत समितीला निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ५२६९ | १० | रेवसा येथे स्मशानभूमी नसल्यामुळे गावकऱ्यांना अंत्यसंस्कारासाठी गावाबाहेर दूर जावे लागत असल्यामुळे वलगाव रस्त्यालगत असलेल्या जीवन प्राधिकरणाच्या सर्वे नंबर 454 मधील जागा स्मशानभूमीसाठी उपलब्ध करण्याबाबत दिनांक 28 जुलै 2019 रोजी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण, अमरावती यांना निवेदन अद्याप कार्यवाही न होणे, अनुषंगाने जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेली जमीन स्मशानभूमीसाठी देण्यात करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५२७१ | १० | अमरावती जिल्ह्यातील मोझरी, कौंडण्यपूर, नांदुरा, पिंगळाई, वरखेड इत्यादी ठिकाणी तसेच जिल्ह्यातील इतर ठिकाणी यात्रा पुण्यतिथी कार्यक्रम दरवर्षी होत असून या कार्यक्रमासाठी लाखो भाविक उपस्थित असतात परंतु येणाऱ्या भाविकांना बाथरूम शौचालय इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाही, अमरावती जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या महत्त्वाच्या यात्रा, पुण्यतिथी कार्यक्रमाकरिता मोबाईल टॉयलेट व्हॅनची व्यवस्था जिल्हा परिषदेमार्फत कायमस्वरूपी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार** |
| (९) | ५२६७ | १०० | कळवण सुरगाणा या १०० टक्के आदिवासी मतदार संघातील मा. बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना अंतर्गत कळवण व सुरगाणा तालुक्यातील ग्रा.पं.गोसराने, ग्रा.पं. ओतूर, ग्रा.पं.पिंपळे बु, ता. कळवण ग्रा.पं.हस्ते, ग्रा.पं.भवाडा ता. सुरगाणा या ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालयमंजूरकरण्यात आली होती सदर ग्रामपंचायतीना स्वताची इमारत तयार होणार होती नवीन इमारतीत पंचायतीचे कामकाज सुरु होण्यास मदत होणार होती तथापि शासनाने या कामांना स्तगीती दिल्याने ग्रामपंचायत कार्यालयाची निकड लक्षात घेता या कामांना निधी उपलब्ध करून देणेची असलेली आवश्यकता परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (१०) | ५२७९ | १० | निफाड, जि. नाशिक मतदार संघातील मा. बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना अंतर्गत निफाड तालुक्यातील ग्रा.पं. बेहेड, ओणे, चाटोरी, कोठुरे पिंपरी या ठीकाणी ग्रामपंचायत कार्यालय मंजूर करण्यात आलेले असणे, सदर ग्रामपंचायतीना स्वमालकीची इमारत तयार होणार होती नवीन इमारतीत पंचायतीचे कामकाज सुरु होण्यास मदत होणार होती तथापि शासनाने या कामांना स्तगीती दिल्याने ग्रामपंचायत कार्यालयाची निकड लक्षात घेता या कामांना निधी उपलब्ध करून देणेची असलेली आवश्यकता परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (११) | ५२५९ | १०० | ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत राज्यात महिला बचत गटाची उभारणी, बांधणी, पतपुरवठा व नियमन आदी कामे करण्यासाठी ग्रामविकास विभागाने उमेद अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचारी नेमलेले असून त्यांना मिळणाऱ्या मानधनात महागाईच्या वाढत्या दरानुसार किमान 15 ते 20 % मानधन वाढ करण्याची होत असलेली मागणीयावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१२) | ५१५९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रात ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही या तालुक्याचा समावेश असून या प्रत्येक तालुक्यात किमान १०० ते १२० गावाचा समावेश असणे, या सर्व गावामध्ये शेतकऱ्यांसह महिला व पुरूषांचे बचत गट असणे, या बचत गटाच्या माध्यमातून स्वंयरोजगार उपलब्ध होण्यासाठी स्वंय रोजगाराची निर्मिती करून विविध साहित्याची, भाजिपाल्याची विक्री करणे, मात्र ग्रामीण भागात या मालाला पाहिजे त्या प्रमाणात प्रतिसाद मिळत नसल्याने अनेक बचत गट बंद पडण्याच्या मार्गावर असणे, त्यामुळे या बचत गटांची आर्थीक प्रगती होण्यासाठी व त्यांच्या सामानाला भाव व विक्री होण्यासाठी तालुका स्तरावर प्रदर्शने भरवणे व कायमस्वरूपी विक्री केंद्रे बांधणे अत्यंत आवश्यक असणे, त्याबाबत मागणी सुध्दा करण्यात येणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथे बचत गटाव्दारे निर्मित मालाची विक्री होण्यासाठी कायमस्वरूपी विक्री केंद्रे बांधणे तसेच वर्षातून किमान सहा वेळा या संदर्भात प्रदर्शने भरवणे बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (१३) | ५२०५ | १० | मौजे मुचंडी ता जत जि सांगली येथील पाणीपुरवठा योजना प्रादेशिक नळ पाणीपुरवठा ही योजना भविष्यात गुचंडी गावामध्ये चालू शकत नसणे, या योजनेमुळे वार्षीक पाणीपट्टी कर गावातील ग्रामस्थ भरू शकत नसणे, प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजने मुळे गावात साथीचे रोग होवू शकतात त्यामुळे गावात रोगराई पसरण्याची शक्यता असणे, स्वतंत्र नळपाणीपुरवठा योजना मंजूर झाल्यास जलजीवन मिशन योजना अंतर्गत गावात नळ पाणीपुरवठा होऊ शकतो व जल जीवन मिशन अंतर्गत गावाला स्वच्छ पाणीपुरवठा करू शकतो. त्यामुळे प्रादेशिक पाणीपुरवठा रद्द करण्याची आवश्यकता व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५०५, ग्रामीण रोजगार**<br>**रूपये:- ३१,०३,१३,७८,०००/-** |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१४) | ५२०८ | १० | प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्राला दिलेले उद्दिष्ट दि.३१ डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण न झाल्यामुळे १ लाख १६ हजार ९५५ घरकुले अन्य राज्यांत वळविण्याचा केंद्र सरकारने आदेश जारी केलेला असणे, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या संचालकांनी राज्यातील सर्व जि.प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निर्देश देऊन शिल्लक घरकुलांची उद्दिष्टपूर्ती करण्याच्या सूचना दिलेल्या असणे, मात्र |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कालावधीच कमी असल्याने कार्यवाही तरी कशी करणार असा पेच सर्वांसमोर निर्माण झालेला असणे,आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणाऱ्या घर उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यात आलेली असणे, शहरी व ग्रामीण भागांसाठी ही योजना लागू असणे, राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेला कमी प्रतिसाद मिळत असून आता देशात या योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांना अत्यल्प प्रतिसाद देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचे नाव समोर आले असणे, केंद्रीय कृषी मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना २५ नोव्हेंबरला पाठविलेल्या पत्रामधून ही बाब समोर आलेली असणे, केंद्राने पाठवलेल्या पत्रातील आकडेवारीनुसार योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या राज्यांच्या यादीत महाराष्ट्र तळाशी असणे, केंद्राने डोक्यावर छप्पर नसलेल्या ग्रामीण भागातील २.९५ कोटी नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मूलभूत सुविधांसह घरे बांधून देण्याचे लक्ष्य ठेवलेले असणे, सरकारला मार्च २०२४ पर्यंत हे लक्ष्य गाठायचे असणे, त्यानुसार ज्या लाभार्थ्यांच्या मालकीचा जमिनीचा तुकडाही नसलेल्या भूमिहीनांचा यासाठी प्राधान्याने विचार होणे अपेक्षित असणे,ज्यांच्याकडे घर बांधण्यासाठी जमीन नाही त्यांना जमीन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित राज्य सरकारांवर असणे, केंद्राकडून आत्तापर्यंत सगळ्याच राज्य सरकारांशी यासंदर्भात आठ वेळा पत्रव्यवहार करण्यात आलेला असणे,देशभरात आजही २ लाख ७९ हजार ६२३ भूमिहीन लाभार्थी घराच्या प्रतीक्षेत असणे, सर्वाधिक लाभार्थी महाराष्ट्रात असून एकूण १ लाख ५६ हजार १७० भूमिहीनांपैकी केवळ ५५ हजार ५२६ लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून घरासाठी जमीन देण्यात आली असणे, १ लाख ६४४ लाभार्थी अद्याप जमीन आणि घरासाठी आर्थिक मदतीच्या प्रतीक्षेत असणे, केंद्र शासनाने या योजनेसाठी महाराष्ट्राला लक्षांक देवूनही प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये राज्य सरकार समाधानकारक कामगिरी करू शकलेले नसणे,राज्यातील तब्बल एक लाख ६४४ लाभार्थी अद्याप घरांसाठी आर्थिक मदतीच्या प्रतीक्षेत असणे,यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (१५) | ५२५५ | १०० | राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सुमारे 14 लाख घरकुलांचे उद्दिष्ट ठरवण्यात आले असणे, या घरकुलांना मंजुरी देण्याची मुदत 31 मार्च 2023 पर्यँत असताना, सदर घरकुलांना 31 डिसेंम्बर 2022 पूर्वीच मंजुरी द्यावी व उर्वरित राहतील ते घरकुलांचे उद्दिष्ट अन्य राज्यात वळविण्यात येईल, असे परिपत्रक केंद्र व राज्य सरकारने सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांना जारी केले असणे, या परिपत्रकामुळे 31 डिसेंम्बर अखेर महाराष्ट्रातील 1 लाख 15 हजार घरकुले रद्द होऊन ती अन्य राज्यात वळविण्यात आली असणे, सदर वळविण्यात आलेली घरकुले रद्द करून ती महाराष्ट्रातील संबंधित जिल्ह्यात पूर्व आराखड्यानुसार वर्ग करण्यात यावीत, याबद्दल होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१६) | ५१६० | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रात ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही या तालुक्याचा समावेश असून या प्रत्येक तालुक्यात किमान १०० ते १२० गावाचा समावेश असून ९५ टक्के शेतकरी, शेतमजूर असणे, या गावातील दुर्बल घटकांनासाठी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल उपलब्ध करून देण्यात येणे, मात्र घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी निधीस उपलब्ध होत नसल्यामुळे लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होणे, तसेच लाभार्थ्यांची संख्या जास्त असून घरकूल लंक्षाक कमी असल्याने अनेक लाभार्थी घरकुलापासून वंचित असणे त्यामुळे या तिनही तालुक्यासाठी घरकुलाचे लक्षांक वाढवून देण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत असतांना सुध्दा याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील प्रत्येक लाभार्थ्यांना घरकुल मिळण्याबाबत तसेच याकामासाठी पर्याप्त निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ५१६१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रात ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही या तालुक्याचा समावेश असून या प्रत्येक तालुक्यात किमान १०० ते १२० गावाचा समावेश असून ९५ टक्के शेतकरी, शेतमजूर असणे, या गावातील दुर्बल घटकांसाठी शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना व ईतर योजने अंतर्गत घरकुल उपलब्ध करून देण्यात येणे, मात्र पात्र लाभार्थ्याजवळ जागाच उपलब्ध नसल्याने त्यांना त्यांच्या हक्काच्या घरकुलापासून वंचति राहावे लागत असणे, त्यामुळे गरजू लाभांर्थी घरकुलापासून वंचति राहू नये यासाठी शासनाने घरकुल योजनां करिता जमीन खरेदी ही योजना सुरू करणे, त्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील ज्या लाभार्थ्याकडे घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी जमीन उपलब्ध नाही त्या लाभार्थ्यांसाठी घरकुल योजनां करिता जमीन खरेदी करणे या योजनेतून जमीन उपलब्ध करून देणे व त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध होणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ५१६३ | १० | केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत चंद्रपूर जिल्हयात २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीत ४३ हजार ४८४ घ्रकुल बांधकाम करण्याचे उददीष्ट देण्यात आले असता त्यातील १५ हजार ७८० घरकुलाचे बांधकाम अघापही झाले नसल्याची माहिती माहे १ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास येणे, ही योजना ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रपूर यांच्या मार्फतीने राबविण्यात असून अधिका-यांच्या दुर्लक्षपणामूळेच घरकुलाचे काम रखडलेले असणे, याबाबत वारंवार तक्रार करून सुध्दा कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयात २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीतील शिाल्ल्क असलेले १५ हजार ७८० घरकुलाचे बांधकाम तातडीने करण्यासाठी व त्याकामासाठी पर्याप्त निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- ६४,२४,५८,२४,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१९) | ५३२१ | १० | मलकापुर विधानसभा मतदार संघात ग्रामीण भागांतील गांवामध्ये रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे, गावांतील रस्त्यांच्या दुरदशेमुळे लोक हैराण आहेत त्यामुळे भागात मुलभूत सुविधा पुरविण्याठी बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघात खालील गावांमध्ये विविध विकास कामे 2515 अंतर्गत मंजुर करण्यात येवून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (२०) | ५३०८ | १० | रत्नागिरी जिल्हा वार्षिक योजना सन 2021-22 रस्ते विकास योजनेअंतर्गत मौजे देवधे खालची सावंतवाडी रस्ता डांबरीकरण करणे, ग्रा.मा.258 ता.लांजा, वेरवली बुद्रुक डोळसवाडी ग्रा.मा.19 रस्ता करणे, (टप्पा-3) ता.लांजा, भडकंबा-बनेवाडी ग्रा.मा. 349 रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. संगमेश्वर जि.रत्नागिरी याकडे सरकारचे झालेले दुलर्क्ष तथा उपाययोजना. |
| (२१) | ५३१२ | १० | कोल्हापूर जिल्हा परिषद परिपत्रकानुसार सेवानिवृत्त 24 वर्ष सलग एकाच वेतन श्रेणी सेवा पूर्ण करणारे सर्व प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी पासून वंचित राहावे लागत असणे, 12 वर्षे सेवा पूर्ण केलेल्या सर्व शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी देण्यात येणे, सातव्या वेतन आयोगामध्ये शिक्षकांसह सर्व शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना दर दहाव्या, विसाव्या व 30 व्या वर्षी पुढील वेतन श्रेणी विना अट देण्याचा शासनाचा निर्णय असताना पदवीधर प्राथमिक सेवा निवृत्त शिक्षकांना पण विनाअट निवड श्रेणी देण्यासाठी शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसणे, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ५३१४ | १० | मौ.जोडपरळी (ता.जि.परभणी) येथे ग्रामपंचायतीने १५ वा वित्त आयोग व जलजीवन मिशन अंतर्गत निकृष्ट दर्जाची कामे करुन भ्रष्टाचार केला असल्याचे उघडकीस येणे, सदरहू कामांची चौकशी व्हावी यासाठी एका संघटनेने दिनांक २५/१/२०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, परभणी यांना निवेदन देऊन उपोषण केले असणे, सदरहू प्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता. |
| (२३) | ५३२० | १० | राज्यात ज्या ग्रामपंचायतींना स्वतःची इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना इमारत बांधकामासाठी स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधकाम योजनेतून निधी उपलब्ध करून दिला जत असणे, यांतर्गत आर्थिक वर्ष 2022- 2023 मध्ये बीड जिल्ह्यातील 218 ग्रामपंचायत बांधकामांना मंजुरी देण्यात आली असणे, यांपैकी तब्बल 144 ग्रामपंचायत बांधकामास अद्याप एक रुपयाही निधी प्राप्त झालेला नसणे, सदर प्रकरणी मंजूर ग्रामपंच्यातीच्या बांधकामासाठी शासन निर्णयाप्रमाणे टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध देण्याबाबत तसेच ग्रामपंचायतींचे बांधकाम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (२४) | ५२७२ | १० | जळगांव जिल्हयातील घोडसगांव, ता.मुक्ताईनगर या ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवकाने 15 व्या वित्त आयोगाच्या निधीमधून गटार बांधकाम व पेव्हर ब्लॉक बसविणे, या कामात झालेला प्रचंड गैरव्यवहार कामे न करतांच बिले अदा करणे, सदर गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता,शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ५२९३ | १०० | ग्रामविकास विभाग अंतर्गत मातोश्री ग्रामपंचायत इमारत बांधकाम योजनेअंतर्गत अंमळनेर तालुक्यामध्ये मंजूर असलेल्या ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकाम कामांना शासन स्तरावरून देण्यात आलेली स्थगिती उठून सदर इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२६) | ५२१७ | १० | येवला जि.नाशिक या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणें, मात्र ग्रामविकास विभागाचे पत्र जा.क्र. विकास २०२२/प्र.क्र.२२७/यो-६ दि. २५ जुलै २०२२ अन्वये ही कामे स्थगित झालेली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. २० ऑगस्ट २०२२ रोजी निवेदनाद्वारे या विकासकामांना दिलेली स्थगिती रद्द करून निधी मंजूर करण्याची मागणी केलेली असणे, येवला जि.नाशिक या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांसाठी या कामांची नितांत गरज असल्यामुळे सदर कामांची स्थगिती रद्द करून निधी उपलब्ध करून देणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ५३०१ | १० | राज्यातील २५ जिल्हापरिषद २८४ पंचायत समित्या आणि ८२० ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय कारकीर्द सुरु असल्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांना पंधराव्या वित्त आयोगाचा निधी न देण्याची केंद्र शासनाने भूमिका घेतलेली असणे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीपासून वंचित राहिल्यामुळे राज्य शासनाला २०० कोटींचा फटका बसलेला असणे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना १५ व्या वित्त आयोगाचा निधी मिळण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (२८) | ५२४४ | १०० | बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र नारायणगड हे तीर्थक्षेत्र असून याठिकाणी श्री नगद नारायण यांची समाधी असणे, याठिकाणी लाखो भाविक दररोज, एकादशी, दसरा, अखंड हरिनाम सप्ताह अशा विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने दर्शनाला येत असणे, नारायणगड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता देण्यात आलेली असणे व या तिर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 25 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (२९) | ५२४८ | १०० | अहमदनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र भगवानगड हे तीर्थक्षेत्र असून याठिकाणी ऐश्वर्य संपन्न संत भगवानबाबा यांची समाधी असणे, याठिकाणी लाखो भाविक दररोज, एकादशी, दसरा, अखंड हरिनाम सप्ताह अशा विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने दर्शनाला येत असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भगवानगड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता देण्यात आलेली असणे व या तिर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 25 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (३०) | ५२५० | १०० | बीड जिल्हा परिषदेत छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणे त्याचबरोबर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांसह विविध महापुरुषांचे स्मारके बांधण्याबाबत एकमताने ठराव मंजूर करून त्यासाठी निधीचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले असणे, सदर स्मारक उभारणीबाबत लोकप्रतिनिधी व नागरिकांची सातत्याने होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (३१) | ५१५६ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी व सिंदेवाही येथील पंचायत समितीची इमारत १९६० पुर्वीची असल्याने फारच जुनी झालेली असून कामकाजाच्या दृष्टीने अयोग्य झालेली असणे, त्यामूळे या दोन्ही नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास ग्रामविकास विभागाने प्रत्येकी अंदाजे १४ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यता देणे, सदर दोन्ही पंचायत समिती इमारतीचे बांधकाम करण्यासाठी व टेडर प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी १५ ते २० टक्के निधीची आवश्यकता असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम चंद्रपूर यांनी अप्पर मुख्य सचिव ग्रामविकास विभाग मुंबई यांच्याकडे पाठविणे, सदर दोन्ही इमारतीच्या बांधकाम निविदा प्रक्रियेत असतांनाच शासनाच्या आदेशान्वये ग्रामविकास विभागाने माहे जुलै २०२२ च्या पत्रान्वये या कामास स्थगिती देणे, तसेच ग्रामविकास विभागाने २५१५ या योजनेतंर्गत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या व निधीसह प्रशासकीस मान्यता मिळालेल्या व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेल्या कामांना सुध्दा शासनाच्या आदेशान्वये ग्रामविकास विभागाने माहे जुलै २०२२ च्या पत्रान्वये स्थगिती देणे, नंतर ही सर्व कामे रदद करणे, त्यामुळे मंजुर असलेले कामे आता होणार नाहीत अशी भावना नागरिकांत निर्माण झाल्यामूळे नागरिंकात पसलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी राज्य शासनाने गेल्या ऑगस्ट २०२२ पासून तर २ डिसेंबर २०२२ च्या दरम्यान राज्यातील अनेक जिल्हयातील रस्त्यांच्या कामावरील दिलेली स्थगिती उठवून कामे पुर्ववत सुरू करण्याचे आदेश दिले त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी व सिंदेवाही पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करणे अत्यंदर कात आवश्यक असल्याने या कामावर दिलेली स्थगिती तातडीने उठवून इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (३२) | ५२१८ | १० | तोगलाबाद ता. दर्यापूर परिसरातील तोगलाबाद- सौंदळी परिसरातील ६०० एकरांवर जमीन ही काळीची जमीन म्हणून सर्वपरीचीत असून नांदरुण शिवारात जाण्यासाठी पांदण रस्त्यावरील गयाटी नाल्यावरील पूल बांधकामाची मागणी बऱ्याच वर्षांपासून स्थानिक शेतकऱ्यांकडून होत असणे, गयाटी नाल्यावर सामदा- सौंदळी लघु सिंचन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रकल्पातील पाण्याचा वर्षभर विसर्ग राहत असून दरवर्षी या नाल्याला मोठ्या प्रमाणात पानी राहत असल्याने शेतीचा मार्ग कायमचा बंद असून या भागातील शेतकऱ्यांच्या शेतजमीनी पडित राहत असून दरवर्षी शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होंत असणे , याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी शेतकरी संघर्ष समिती गठीत केली असून मोठ्या आंदोलनाच्या पवित्रात असणे, सदर नाल्यावर पुलाचे बांधकाम करण्याची नितांत आवश्यकता , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ५२२० | १० | पंचायत समिती कार्यालय , दर्यापूर जि. अमरावती ही ब्रिटिशकालीन इमारत जुनी व शिकस्त झाली असून राहण्यायोग्य नसून इमारतीचा काही भाग कोसळून जीवित तसेच वित्तहानी होण्याची शक्यता असणे , सदर इमारत बांधकामाचा अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सन २०२१ मध्ये शासनास सादर असणे , परंतु अद्यापही सदर इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता मिळालेली नसणे , याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार शासनाकडे लेखी पत्राद्वारे मागणी केलेली असणे , सदर इमारत बांधकामाच्या प्रस्तावास निधीसाह प्रशासकीय मान्यता देण्याची नितांत आवश्यकता , याबात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ५२३० | १० | सन २००७ मध्ये दर्यापूर जि. अमरावती येथील चंद्रभागा नदीला आलेल्या महापुरामुळे नालवाडा या गावात मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी घुसून मोठ्या प्रमाणात गावाचे नुकसान झालेले असून या गावात जुन्या गावठाणामध्ये ब्लू झोन लागू करण्यात आला असणे , ब्लु झोनमध्ये जुने गावठाण असल्याने मागील १४ वर्षांपासून कोणतेही विकास कामे झाले नसून येथील रहिवासी घरकुल तसेच शासनाच्या विविध विकासापासून वंचित असून दिनांक २५ मार्च २०२१ रोजीच्या जिल्हाधिकारी अमरावती यांच्या पत्रान्वये निळ्या पट्ट्याची अट शिथिल करून नागरी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचे नमूद असणे परंतु येथील विकास कामे मंजूर असताना स्थानिक प्रशासन चे ब्लू झोन कारणे देत विकास कामात अडथळा निर्माण करीत असणे ,यामुळे येथील स्थानिक ग्रामस्थामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ५२६२ | १० | दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील बोराळा , गौरखेडा , कळमगव्हाण , सामदा , विहीगाव , चिंचोली शिंगणे ,धामोडी , काळगव्हाण , खासपूर , वासणी बू , खैरि , येवता , नालावाडा , निमखेड बाजार या ग्रामपंचायतीची इमारतीची अतिशय दुर्दशा झालेली असणे , सदर ग्रामपंचायतीची दुरावस्था झाल्याने इमारत राहण्यायोग्य नसणे , या ग्रामपंचायत इमारतीमध्ये अक्षरक्षा पावसाचे पाणी जमा होऊन स्लॅब गळत असणे , यामुळे येथील ग्रामपंछायातीच्या दस्तऐवजास धोका निर्माण झालेला असणे , त्यामुळे या ग्रामपंचायतीचे बांधकाम होण्याची नितांत आवश्यकता , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३६) | ५२७८ | १० | अमरावती जिल्ह्यातील बहुतांश पंचायत समित्यांवर सार्वत्रिक निवडणुका लांबणीवर पडल्याने शासनामार्फत तेथील स्थानिक गटविकास अधिकारी यांची प्रशासक म्हणून नेमणूक केलेली असणे , त्याचप्रमाणे जिल्हा परिषद अमरावती येथे शासनामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची प्रशंसक म्हणून नियुक्ती केली असणे , पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर प्रशंसक नियुक्त असल्याने १५ व्या वित्त आयोगाच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शिफारशीनुसारजिल्हा परिषद आणि पंचायत समितींना विविध विकास योजनांसाठी सहाय्यक अनुदानाचे नियोजन न झाल्याने शासनास निधी परत गेलेला असणे , यामुळे ग्रामीण भागातील नागरीक मूलभूत सुविधेपयसून वंचीत असणे , यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे , सदर निधीचे नियोजन करून ग्रामीण भागात विविध विकास योजना राबवण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पुल**<br>**रूपये:- ७,६३,९१,१०,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (३७) | ५३११ | १० | बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील धरणगाव धुपेश्वर दरम्यान मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बांधण्यात आलेल्या रस्त्यावर खड्डे पडल्याची व साईट पट्ट्या न भरल्यामुळे नागरीकांना होणारा त्रास, सदर रस्त्या प्रकरणी देखभाल दुरुस्तीची जबाबदारी निश्चित करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (३८) | ५३१५ | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील खिरवड अटवाडे रस्ता (ग्रामा-४५) ३.०० किमी रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (३९) | ५३१९ | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील के-हाळे कर्जोद रस्ता (ग्रामा ७३) २.०० किमी रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४०) | ५३२२ | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील पातोंडी ते मोरगांव रस्ता (ग्रामा ४३ २.०० किमी रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (४१) | ५२८८ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील रामा १२० ते झेंडेवाडी ते जळका मारुती मार्ग सा.क्र.१/५०० ते २/३०० ता. पुरंदर या रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४२) | ५२९१ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील रामा १२० ते बाळरखमाजीचीवाडी रस्ता सा.क्र.०/०० ते ३/०० व ग्रामा १७१ ४० या रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४३) | ५२९६ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील इजिमा ११६ कोथळे वकीलवस्ती धालेवाडी बेंदवस्ती ते जेजूरी रेल्वे पर्यंत चा जोडमार्ग सा. क्र. ००/०० व १ /५०० ग्रामा १३५ २० या रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४४) | ५२९९ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील इजिमा ११३ ते रणवरेवाडी रस्ता सा. क्र. ०० /०० ते ३/०० ४० या रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४५) | ५३०४ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील आंबळे ते बेंदवस्ती रस्ता सा. क्र. ०/०० ते १/०० ग्रामा २९ ३५ या रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४६) | ५३०७ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील नारायणपुर रामोशी ते वज्रगड किल्ला पायथा ग्रामा २५६ या रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (४७) | ५२०९ | १० | नागपूर जिल्ह्यातील मौजा झिंगाबाई टाकळी, गोरेवाडा या मौजांच्या सिमेलगत गोधणी रेल्वे दरम्यानच्या शिवपांधण त्यावरून दररोज हजारो रहिवाशी नागरिकांची ये-जा असणे, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरीकांना ये-जा करण्यास अडचणींचा सामना करावा लागत असणे प्रसंगी अपघात सुध्दा घडत असणे, त्याकरीता या पांदन रस्त्यांचे विकास कार्य तातडीने व अविलंब करणे नितांतगरजेचे असून अशाप्रकारच्या अत्यावश्यक मुलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (४८) | ५२६५ | १० | अमरावती जिल्हातील भातुकली तालुक्यामधील वाठोडा शुक्लेश्वर ते म्हैसपूर रस्त्याचे काम अपूर्ण केल्यामुळे अतिवृष्टीने रस्ता अत्यंत खराब झालेला असून नागरिकांना येणे जाणे अत्यंत त्रासदायक ठरत आहे व भविष्यात जीवितहानी होण्याची शक्यता आहे, सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ करण्यात यावे, याकरीता दिनांक 4 ऑगस्ट 2022 रोजी मा. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती यांना निवेदन दिले आहे. सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (४९) | ५१६८ | १० | लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील भेटा अंदोरा ग्रा मा क्र 4 वरील किमी 0/500 व किमी 1/200 मधील पुलाचे बांधकाम करणे आवश्यक असणे.सदर कामासाठी निधीची तरतुद करण्याची आवश्यकता, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार** |
| (५०) | ५२५७ | १०० | कळवण सुरगाणा या १०० टक्के आदिवासी मतदार संघातील रामा २२ ते दळवट, कोसुर्डे रस्ता सा.क्र.०/०० ते १/२०० इजिमा ७८ ता. कळवण हा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असून या रस्त्याच्या मंजुरी कामास शासनाने स्थगिती दिलेली आहे रस्त्याची निकड लक्षात घेता सदर कामावरील स्थगिती उठविणे गरजेची आहे तथापि सदर कामास निधी उपलब्ध करून देनेची असलेली आवश्यकता परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. पी.एन.पाटील (सडोलीकर)** |
| (५१) | ५२१९ | १० | कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील रामा क्र. 189 ते कुरुकली कॉलेज रस्ता ग्रामा 77 किमी0/00 ते 2/00 रुंदीकरणासह सुधारणा करणे ता.करवीर जि. कोल्हापूर केलेल्या रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (५२) | ५२२१ | १० | कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील प्रजिमा क्र. 35 पासून हसूर हिरवडे खालसा देऊळवाडी गाडेगोंडवाडी शेळकेवाडी ते वाशी इजिम क्र. 81 भाग देऊळवाडी बाचणी ते क्रीडा संकुल रुंदीकरणासह सुधारणा करणे ता.करवीर जि.कोल्हापूर रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (५३) | ५२२३ | १० | कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील हसुर सोनाळी पाटेकरवाडी रस्ता ग्रामा क्र.217 किमी 1/500 ते 2/500 रस्त्याची रुंदीकरणास सुधारणा करणे व रस्त्याच्या बाजूला संरक्षक भिंत बांधणे भाग सोनाळी फाटा ते सोनाळी गाव ता.करवीर जि.कोल्हापूर रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (५४) | ५२२७ | १० | कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील रामा क्र.189 कोथळी बेले ग्रामीण रस्ता ग्रामाक्र 161 किमी0/00ते 3/00 रुंदीकरणासह सुधारणा करणे ता.करवीर जि.कोल्हापूर रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (५५) | ५२३९ | १० | कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील रामा 193 पासुन पाटपन्हाळा मानवाड वाशी रस्ता इजिमा 22 किमी 7/750 मध्ये लहान पूल बांधणे रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (५६) | ५२४६ | १० | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील सुळे आकुर्डे रस्ता ग्रामा 48 वरील धामणी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे. (पोहच रस्त्यकरीता भुसंपादन करणे रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (५७) | ५२४९ | १० | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील रामा 193 पासून यवलूज हरिजन वस्ती जवळून प्रजिमा 18 ला चौगुले वस्ती जवळ मिळणारा रस्ता ग्रामा 86 किमी 0/00 ते 1/00 चे काँक्रीटीकरण करणे. (30.00 मी संरक्षक भिंत बांधणे सह ) रस्त्यावरून हजारो नागरिक ये जा करत असतात, परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना याचा करण्याचा अडचणीचा सामना करावा लागतो, प्रसंगी अपघात सुद्धा घडत असतात. त्याकरिता सदर रस्त्यांचे विकास कार्य तातडीने अविलंब करणे अत्यंत गरजेचे आहे, जेणेकरून नागरिकांना ये जा करणे सोयीचे व सुकर होईल. अशा प्रकारच्या अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५८) | ५००१ | १० | संगमेश्वर ( जि. रत्नागिरी) कळंबस्ते मोहल्ला पोस्ट ऑफिस ते कब्रस्तान कडून दयांकडे जाणारा रस्ता कॉक्रीट करणे, अतिशय गरजेचे असून स्थानिकांची सततची मागणी असणे, सदयस्थितीमध्ये रस्ता कच्चा/ नादुरुस्त असणे, सदर रस्त्याने ग्रामस्थांना ये- जा करणे खूप अडचणी निर्माण होत असणे, त्यामुळे सदरचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे हे काम अतिशय गरजेचे असल्याने ते कोणत्याही योजने अंतर्गत काम करण्यात येणे आवश्यक असून त्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (५९) | ५००४ | १० | ओझर ते कातवड (ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याचे मजबुतीकरणे व खडीकरण करण्याची गरज असणे, रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असणे, खड्डयामुळे अपघात होत असणे, रस्ता वाहतुकीस असरुक्षित असणे, रस्ता असुरक्षित असल्यामुळे शाळेतील मुले, वृध्द व्यक्ती व शहराकडे भाजीपाला विकण्यासाठी जाणाऱ्या व येणाऱ्याचा वापर होत असणे, रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. ग्रामविकास मंत्री, यांचकडे दि.१३ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास वारंवार केली असणे, मा९ शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत शाळेतील मुलांमध्ये, वृध्दांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (६०) | ५१४९ | १० | मौजे वरेरी (तालुका-देवगड, जिल्हा-सिंधुदूर्ग) या गावातील प्रा.जि.मा.17 ह्या रस्त्यावरील कॉजवेची उंची वाढवून मिळण्यासाठी या भागातील ग्रामस्थांनी मा.ग्रामविकास मंत्री, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सिंधुदूर्ग जिल्हापालक मंत्री, मा.जिल्हाधिकारी,सिंधुदूर्ग , मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,सिंधुदूर्ग यांचेकडे माहे सप्टेंबर, 2018 पासून सातत्याने प्रत्यक्ष भेटून/निवेदने देवूनही अद्यापपर्यन्त काहीही कार्यवाही न होणे, वेरेरी गावातील प्रा.जि.मा.17 ह्या रस्त्यावरील दाभोळे-बौध्दवाडी जोडरस्ता राणेवाडी हया ठिकाणावरील कॉजवेची उंची लहान असल्याने पावसाळयाच्या दिवसात कॉजवेरुन पाणी वाहत असल्यामुळे ग्रामस्थांना जाण्या-येण्याचा मार्ग बंद होणे, त्यामुळे सदरच्या काजवेची उंची वाढवून मिळण्याबाबत ग्रामस्थांनी वारंवार शासनाकडे मागणी करुनही केवळ ग्रामीण रस्ता म्हणून शासनाचे ग्रामस्थांच्या या मागणीकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष परिणामी, ग्रामस्थामध्ये परसलेली नैराश्याची भावना व तिव्र संताप, शासनाने वेरेरी गावातील प्रा.जि.मा.17 रस्त्यावरील दाभोळे-बौध्दवाडी जोडरस्ता राणेवाडी हया ठिकाणावरील कॉजवेची उंची वाढवून देण्याच्यादृष्टीने केलेली वा करावयाची तातडीची उपाययोजना व कार्यवाही. |
| (६१) | ५१७४ | १० | मौजे वाकण खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी (तालुका-पोलादपूर, जिल्हा रायगड) या ५०० मिटर लांबीचा अंतर्गत वाडीजोड रस्त्याचे मजबुतीकरण-डांबरीकरण करुन देण्यासाठी या भागातील ग्रामस्थांनी (१) मा.ग्रामविकास मंत्री (2) जिल्हाधिकारी, रायगड, (3) उपअभियंता, सा.बां.विभाग, पोलादपूर (4) मुख्याधिकारी, रायगड जिल्हापरिषद, अलिबाग यांच्याकडे सातत्याने मागणी/पाठपुरावा करुनही उद्यापपर्यन्त या रस्त्याचे डांबरीकरण झालेले नसून ग्रामीण रस्ता म्हणून शासनाने दुर्लक्ष करणे, सदर रस्त्यांच्या जागेसाठी संबंधीत जागामालक ग्रामस्थानी ग्रामपंचायतीकडे जागाहस्तांतरणासाठी ना-हरकत बक्षिसपत्र निवेदन दिलेले असून ग्रामपंचायतीने सदरचा प्रस्ताव गटविकास अधिकारी, पोलादपूर यांच्याकडे पाठविलेला असतानाही ग्रामीण रस्ता म्हणून अद्यापपर्यन्त काहीही कार्यवाही न करता या मागणीकडे केलेले दुर्लक्ष, परिणामत: त्या परिसरातील ग्रामस्थांना कच्चा रस्त्यामुळे सोसाव्या लागणाऱ्या दळणवळणाच्या गंभीर समस्या, चांगल्या रस्त्याअभावी अनेक अडचणींना या भागातील ग्रामस्थ हैराण झाल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेली संतापाची लाट, सबब, मौजे वाकण खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी यासंपूर्ण रस्ता मजबुतीकरणासह-डांबरीकरणाचे काम हाती घेऊन तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता वा करावयाची तातडीची उपायोजना व कारवाई. |
| (६२) | ५२५८ | १० | मौ.गजवडी ते स्मशान भूमी गोळेवाडी, ता.जि.सातारा या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामास माहे जानेवारी,२०२२ च्या दुस-या आठवडयात प्रशासकीय मान्यता मिळावी असणे, डांबरीकरणाच्या व मजबूती करण्याच्याय कामास अद्याप सुरुवात झाली नसणे, रस्त्याअभावी ग्रामस्थांना प्रेत नेण्यास अडथळा निर्माण होत असणे, अंत्यविधी पार पाडता येत नसणे, रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६३) | ५२८३ | १० | नागपूर जिल्हयातील  कळमेश्वर व सावनेर तालूक्याचा समावेश असणे, या दोनही तालुक्यातील ग्रामीण रस्ते  नादुरुस्त व रहदारीस अयोग्य असल्याने वारंवार अपघात घडणे, या कारणास्तव राज्य शासनाने माहे जानेवारी २०२१ पासून तर जुलै २०२२ पर्यत झालेल्या अधिवेशनातील अर्थसंकल्प, पुरवणी मागण्यामध्ये रस्ते दुरूस्ती व नवीन रस्त्याची कामांना निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूर करणे, मंजूर असलेल्या या सर्व कामाची निविदा प्रक्रिया अंतिम ठप्पात असतांना तर काही कामांना तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया सुरू करणे बाकी असतांना राज्य शासनाच्या आदेशानुसार विभागाने दिंनाक २६ जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविणे, त्यामूळे या दोनही तालुक्यातील दळणवळणाचे मुख्य साधन असलेल्या रस्त्यांच्या कामांना स्थगिती देण्यात  येणे, स्थगितीमुळे रस्त्यांची कामे ठप्प झालेली असल्यामूळे सदर रस्ते अत्यंत खराब झाल्याने या रस्तावर वारंवार अपघात होऊन निरपराध लोकांचा बळी जात असल्यामूळे नागरिकात पसरलेले  तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामूळे राज्य शासनाने गेल्या ऑगस्ट २०२२ पासून तर २ डिसेंबर २०२२ च्या दरम्यान राज्यातील अनेक जिल्हयातील रस्त्यांच्या कामावरील दिलेली स्थगिती उठवून कामे पुर्ववत सुरू करण्याचे आदेश दिले त्याच धर्तीवर नागपूर जिल्हयातील  कळमेश्वर व सावनेर तालुक्यातील रस्त्यांच्या सर्व कामांना दिलेली स्थगिती उठवून ही सर्व कामे पुर्ववत सुरू करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ५९,२४,९७,५०,०००/-**<br>**श्री. धिरज देशमुख** |
| (६४) | ५१६२ | १० | तावरजा धरणाचे खाली ग्रामीण मार्ग १०८ प्रमुख जिल्हा मार्ग ते उटी शिव रस्ता या रस्त्यावर पुल बांधणे आवश्यक असणे, ग्रा.मा.८८ विमानतळ ते हरंगुळ इजिमा १२७ पर्यंत रस्ता दुरूस्त करणे आवश्यक असणे, ग्रा.मा.२५ नागझरी ते इंदरठाणा रस्ता दुरूस्त करणे आवश्यक असणे,सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (६५) | ५१६६ | १० | चंद्रपूर जिल्हयात  ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालूक्याचा समावेश असणे, या तीनही तालुक्यातील भागातील रस्ते व पुल नादुरुस्त व रहदारीस अयोग्य असल्याने वारंवार अपघात होणे, त्यामुळे कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांच्या मार्फतीने रस्ते व पुलाचे कामे अर्थसंकल्प २०२३ च्या बजेटमध्ये मंजूर होण्यासाठी प्रस्ताव पाठविणे, त्यात चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील वाढोणा सावरगांव कन्हाळगांव धुमनखेडा रत्नापूर शिवणी ते प्रजिमा 44 ला जोडणारा इजिमा 124 कि.मी. 12/650 वर लहान पुलाचे बांधकाम करणे,चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील प्ररामा 9 ते चिखलगांव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नांदगांव देलनवाडी नवरगांव ते रामा 323 ला जोडणारा इजिमा 131 कि.मी. 4/100 वर लहान पुलाचे बांधकाम करणे,चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील ब्रम्हपुरी ते चांदगाव रस्ता (इजिमा-94) किमी 2/00 मध्ये लहान पुलाचे पुर्नबांधकाम करणे.,चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील चोरटी धामनगांव चौगान किन्ही रस्ता (इजिमा-90) वर किमी 0/500 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे., चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील बरडकिन्ही गोगाव रस्ता (ग्रामा-124) किमी 0/800 वर लहान पुलाचे बांधकाम करणे.,चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील टेकरी प्रजिमा-30 ते कन्हाळगाव रस्ता ग्रामा-29 कि.मी. 0/600 वर लहान पुलाचे बांधकाम करणे,चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील तुलानमेंढा ते गायडोगरी रस्ता (ग्रामा-102) किमी 1/200 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे., मरेगाव ते खैरी चक पवनपार रस्त्यावर किमी 3/00 लहान पुलाचे बांधकाम करणे ग्रामा-26 ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर , चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील आकापुर ते जुगनाळा रस्ता (ग्रामा-100) किमी 1/200 मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे.,या कामाचा समावेश असणे, मात्र यातील एकाही कामांना अर्थसंकल्पातील बजेटमध्ये मंजूरी मिळालेली नसणे, त्यामुळे रहदारीस अयोग्य असलेल्या या पुलांची/रस्त्यांची कामे आता होणार नाही अशी भावना नागरिकात पसरलेली असल्याने नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना बारमाही रस्ते उपलब्ध होण्यासाठी प्रस्तावित केलेल्या कामांना निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (६६) | ५१६७ | १० | चंद्रपूर जिल्हयात ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली तालूक्याचा समावेश असणे, या तीनही तालुक्यातील भागातील रस्ते व पुल नादुरुस्त व रहदारीस अयोग्य असल्याने वारंवार अपघात होणे, यात निरपराध लोकांचा बळी जाणे, त्यामुळे तिनही तालुक्यातील नागरिकांनी खराब झालेल्या रस्त्यांचे बांधकाम करणेबाबत वारंवार मागणी करणे मात्र या मागणीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे आता खराब रस्त्यांची कामे होणार नाही अशी भावना नागरिकात निर्माण होत असल्याने त्यांच्यात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांना मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजने अंतर्गत मंजूर करण्यासाठी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम चंद्रपूर यांच्याकडून प्रस्ताव बोलावून त्या प्रस्तावास निधीसह मंजूर करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६७) | ५००३ | १० | चौके-बावखोल-आंबेरी-धामापूर रस्ता (तालुका-मालवण) हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-1 अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पॅकेज क्रमांक SIN-14 मधील रस्ता आहे. या रस्त्याच्या 6.5 कि.मी.लांबीच्या व रुपये 430.35 लक्ष किंमतीच्या कामास शासनाने प्रशासकीय मान्याता देणे, सदर कामामध्ये ग्राम-402 (1/800 ते 3/00=1.2 कि.मी.) व ग्राम-408 (0/00 ते 5/300=5.3 कि.मी.) अशी लांबी समाविष्ट करणे, परंतु लोकवस्तीमधून जाणाऱ्या ग्राम-402 रस्त्याची सा.क्र.0/00 ते 1/500 ही लांबी समाविष्ट |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | न केल्याने रस्त्याला ठिकठिकाणी खड्डे पडून झालेल्या दयनीय अवस्थेमुळे रहिवाश्यांना रस्त्याने चालणे, वाहन चालवणे धोकादायक झालेले आहे. ग्राम-402 रस्त्यावरील 0/00 ते 1/800 लांबीचा डांबरी पृष्ठभाग खराब झाला असून नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सदरचे काम सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेस रस्ते दुरुस्तीच्या विविध योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून प्राथम्याने हाती घेण्याच्या सूचना राज्य शासनाच्या ग्रामविकास (बांधकाम-3) विभागाने देणे, परंतु शासनाकडून सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेस निधी उपलब्ध करुन न दिल्याने काम अद्याप हाती न घेणे, या मार्गाकडे शासनाचे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, परिणामी, सदर रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करुन सुधारणा करण्याची होत असलेली मागणी, संपूर्ण रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्याने या भागातील नागरीकांना चांगल्या रस्त्याअभावी सोसाव्या लागणाऱ्या दळणवळणाच्या गंभीर समस्या, 0/00 ते 1/800 हा रस्त्याचा भाग नागरीकांचा रहदारीचा मुख्य मार्ग असल्याने चांगल्या रस्त्याअभावी अनेक अडचणींनी या भागातील नागरीक हैराण होणे, त्यांच्यामध्ये पसरलेली तिव्र संतापाची लाट, नागरीकांची मागणी लक्षात घेता शासनाने ग्राम-402 रस्त्यावरील 0/00 ते 1/800 लांबीमध्ये पडलेले खड्डे बूजवून रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाची सुधारणा करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १६ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) ग्रामविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई